सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करून विविध उपाययोजना व मदत जाहीर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण - २०१७/प्र.क्र.१७३ /म-७

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: ३० ऑक्टोबर, २०१७

वाचा:- १) शासन निर्णय,समक्रमांक, दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना :

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार जिल्हातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. संदर्भाधीन शासन निर्णय व दुष्काळ व्यवस्थापन संहितेमध्ये विहित केलेल्या निकषानुसार खरीप २०१७ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करून अशा तालुक्यात विविध उपाययोजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता , पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यामध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून राज्य शासनाने खाली नमूद केलेल्या ३ तालुक्यांमध्ये **मध्यम स्वरूपाचा दुष्काळ** जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.

अ.क्र.	जिल्हा	तालुका
१.	गोंदिया	१. गोंदिया २. तिरोडा ३. गोरेगांव

२. उपरोक्त नमूद केलेल्या तालुक्यांना खालील सवलती लागू करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

३. या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करण्यात यावा.

४. सदर तालुक्यातील खातेदारांना कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान अनुज्ञेय राहील. सदर निविष्ठा अनुदान हे कोरडवाहू पिक उत्पादित केलेल्या व ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या खातेदारांना अनुज्ञेय राहील. निविष्ठा अनुदानाचे दर व इतर अटी व शर्ती या शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३ मे, २०१५ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

५. सदर मदतीचे वाटप सन २०१७ च्या खरीप हंगामातील ७/१२ मधील पिकांच्या नोंदीच्या आधारे करण्यात यावे.

६. हंगामातील अंतिम पैसेवारीसाठी करण्यात आलेल्या पिक कापणी प्रयोगाअंती आलेल्या पिक निहाय पैसेवारीच्या आधारे कोरडवाहू पीकांचे ३३ टक्के नुकसान ठरविण्यात यावे. प्रमुख पिक नसलेल्या व पिक कापणी प्रयोग न केलेल्या कोरडवाहू पिकांना सुध्दा मदत अनुज्ञेय राहील.

७. बहुवार्षिक फळपिके व बागायती पिके यांचे ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान झाल्याची शहनिशा शेतीनिहाय पंचनामे करून करण्यात यावे. पंचनाम्यासोबत अशा शेतीतील पिकांचे ग्लोबल पोजिशनिंग सिस्टीम (GPS coordinates) दर्शविणारे फोटो काढण्यात यावेत. जेणेकरून नुकसानीच्या दाव्याची ग्राह्यता पडताळता येईल.

८. बहुवार्षिक फळपिके व बागायती पिकांचे नुकसान ठरविण्याचा निकष ७/१२ मधील नोंद हा असेल.नुकसानीची तीव्रता ठरविण्यासाठी पंचनामा हा निकष असेल.बहुवार्षिक फळपिके व बागायती पिकांचे नुकसान ठरविण्यासाठी त्याची नोंद ७/१२ मध्ये असणे आवश्यक आहे.

९. सन २०१७ च्या खरीप हंगामातील पिक पाहणी मधील पिकांच्या ७/१२ मधील उताऱ्यातील नोंदीबाबत कोणताही आक्षेप उद्भवल्यास त्याचे निराकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील तरतूदीनुसार करण्यात यावे.

१०. सदरहू आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११. दुष्काळ घोषित केल्याचे आदेश दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ पासून अंमलात येतील व शासनाने हे आदेश रद्द न केल्यास पुढील ६ महिन्यांच्या कालावधी पर्यंत लागू राहतील. संबंधित जिल्हाधिकारी यांनी या आदेशास जिल्हयामध्ये प्रसिध्दी द्यावी. तसेच संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना दुष्काळ

घोषित केलेल्या तालुक्यांमध्ये आवश्यक उपाययोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी तातडीने आवश्यक उपाययोजना अंमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०३१११४८१८३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
Date: 2017.10.31 11:39:44 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य,
५) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
८) प्रधान सचिव (कृषी), मंत्रालय,मुंबई,
९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
१०) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) जिल्हाधिकारी, गोंदिया
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
१५) जिल्हा कोषागार अधिकारी,गोंदिया
१६) अधिक्षक जिल्हा कृषी अधिकारी, गोंदिया
१७) जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, गोंदिया
१८) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१९) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२०) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय)
२१) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन,
२२) महसूल व वन विभागातील (कार्यासन क्रमांक म-३/म-७/म-११)
२३) निवडनस्ती (कार्यासन म-७).